पीएच.डी., संशोधन आराखडा

"मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनांचा विवेचक अभ्यास"

कला विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास शोध प्रबंधाचा आराखडा सादर

संशोधक

बिरादार अरविंद व्यंकटराव

(एम.ए., एम.एड, नेट (मराठी)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे

मराठी विभाग प्रमुख

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

: संशोधन केंद्र :

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

एप्रिल - २०१९

<u>अनुक्रमणिका</u>

१) प्रस्तावना

२) संशोधन विषयाच्या निवडीमागील भूमिका

३) संशोधनाचे महत्त्व

४) संशोधनाची उद्दिष्ट्ये

५) संशोधनाची गृहितके

६) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

७) संशोधनाची साधने

८) संशोधन पद्धती

९) प्रकरण मांडणी

१०) परिशिष्ट्ये

प्रस्तावना

मानवाने आजपर्यंत जी नेत्रदीपक प्रगती केली आहे त्यात भाषेचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. मानवाने निसर्गाच्या निरिक्षणातून, चिंतनातून, कल्पनेतून मिळविलेले ज्ञान लेखनरूपाने शब्दबद्ध केले आणि त्यातूनच साहित्याचा जन्म झाला. हे साहित्यसंचित मानवाच्या प्रगतीला पोषक, मार्गदर्शक व प्रेरक ठरते.

साहित्यविश्वाचा विचार करता कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र अशा सर्व अंगांनी मराठी साहित्यविश्व खूप समृद्ध आहे. इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावाने अनेक नवे वाङ्मयप्रकार मराठीत निर्माण झाले. त्यापैकीच एक म्हणजे 'प्रवासवर्णन' होय. देश-विदेशातील केलेल्या प्रवासातील अनुभव लेखनरूपाने मांडणे, यालाच स्थुलमानाने प्रवासवर्णन असे म्हणता येईल.

मराठीत सुरुवातीला असे लेखन वृत्तांतवजा किंवा गोषवारा सांगणारे होते. उदा. महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकरांचे 'कोलंबसचा प्रवास' (१८४९) इ. त्यानंतरच्या काळात विष्णूभट गोडसे यांचे 'माझा प्रवास'(१८५७), पु.ल. देशपांडे यांचे 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', अनंत काणेकरांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' इ. वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने उल्लेखनीय प्रवासवर्णने आहेत. पण यानंतरच्या काळात प्रवासवर्णन या साहित्यप्रकारात लेखन व संशोधन या दोन्ही दृष्टीने दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते म्हणून या साहित्यप्रकारात संशोधनाला वाव आहे. अलीकडच्या काळात प्रवासवर्णन साहित्यप्रकारात मीना प्रभु या लेखिकेचे कार्य उल्लेखनीय असून त्यांची प्रवासवर्णने वाङ्मयीन मूल्याच्या दृष्टीने खूप समृद्ध आहेत. त्यामुळे 'मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाचा विवेचक अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाच्या निवडीमागील भूमिका

मराठी साहित्यविश्वाचा विचार करता कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या विविध साहित्यप्रकारात खूप मोठ्या प्रमाणात लेखन व संशोधनकार्य झालेले आहे. परंतु प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराकडे लेखन व संशोधन या दोन्ही दृष्टीने काहीसे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. अलीकडे मीना प्रभु यांचे प्रवासलेखन क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. म्हणून त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनामागील हेतू, प्रेरणा, भूमिका, त्यांची लेखनशैली,

प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराला नवसंजिवनी देण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. याच हेतूने (भूमिकेतून) प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाचे महत्त्व

मीना प्रभु यांचे प्रवासवर्णन हे वाङ्मयप्रकाराच्या विकास परंपरेतील एक महत्त्वाचा टप्पा होय. म्हणून या प्रवासवर्णनातील वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांचा शोध घेणे मराठीतील प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार समृद्ध करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. प्रस्तुत संशोधनामुळे प्रवासवर्णनाचे महत्त्व काही प्रमाणात का होईना लक्षात येईल. त्यामुळे या वाङ्मयप्रकारात लेखन व संशोधन करण्यासाठी अनेकांचे लक्ष वेधण्यास हे संशोधन महत्त्वाची भूमिका बजावेल. त्याचप्रमाणे प्रवासवर्णन या साहित्यप्रकारात संशोधन करू पाहणाऱ्या संशोधकास प्रस्तुत संशोधन मार्गदर्शकाच्या रूपात महत्त्वाचे ठरेल. तसेच देश-विदेशातील समकालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, भौगोलिक, ऐतिहासिक परिस्थितीची तुलनात्मक माहिती जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे ठरेल.

संशोधनाची उद्दिष्टे

१) प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराची संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये जाणून घेणे.

२) मीना प्रभु यांच्या प्रवासलेखनामागील प्रेरणा जाणून घेणे.

३) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाचे स्वरूप, वैशिष्ट्ये जाणून घेणे.

४) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनातून प्रतिबिंबित झालेल्या व्यक्तीदर्शनाचा आढावा घेणे.

५) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनातील वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेणे.

६) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनात प्रतिबिंबित झालेल्या त्या-त्या प्रदेशाची भौगोलिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

७) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनपर लेखनशैलीचा अभ्यास करणे.

८) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाचे मराठी साहित्यातील स्थान लक्षात घेणे.

संशोधनाची गृहितके

१) मराठी साहित्याच्या इतर प्रकारात जेवढे संशोधन कार्य झाले आहे त्या तुलनेने प्रवासवर्णन या साहित्यप्रकारात झालेले नाही.

२) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णन लेखनामुळे हा वाङ्मयप्रकार समृद्ध झाला आहे.

३) मीना प्रभु यांची प्रवासवर्णने वाङ्मयीन मूल्यांच्या दृष्टीने समृद्ध आहेत.

४) प्रवासवर्णनकाराच्या व्यक्तिमत्त्वामागे जसे पिढ्यानपिढ्याचे संचित उभे असते तसे तसे स्थळामागेही परंपरा, इतिहास, संस्कृती यांचे संचित उभे असते.

५) मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनात वेगवेगळ्या प्रदेशातील राजकीय, भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक इत्यादी विविध घटकांची वैशिष्ट्ये प्रतिबिंबित झालेली आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधनातून मीना प्रभु यांचे व्यक्तित्व व प्रवासलेखनामागील भूमिका जाणून घेतली जाईल. तसेच मीना प्रभु यांच्या जवळपास सर्वच प्रवासवर्णनपर लेखनाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात अपेक्षित आहे. परंतु लेखिकाच्या सर्व पुस्तकातील सर्वच घटकांचा परामर्श घेणे हे वेळेच्या दृष्टीने शक्य नाही. तसेच प्रस्तुत संशोधन केवळ मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराशी संबंधित असल्यामुळे इतर साहित्यप्रकारात संशोधन करणाऱ्यांसाठी प्रस्तुत संशोधन मार्गदर्शक ठरेलच असे नाही. मीना प्रभु या प्रवासाच्या निमित्ताने देशविदेशात राहत असल्यामुळे संशोधकास लेखिकेची प्रत्यक्ष मुलाखत घेणे शक्य नाही. प्रस्तुत संशोधन केवळ मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाशी संबंधीत आहे. अशा काही मर्यादा हे संशोधन कार्य हाती घेण्यापूर्वी लक्षात घ्यावा लागतील.

संशोधनाची साधने

सदरील विषयानुषंगाने संशोधन कार्य करण्यासाठी संशोधनाची साधने म्हणून मीना प्रभु यांच्या सर्व प्रवासवर्णनपर पुस्तकांचा आधारभूत ग्रंथ म्हणून वापर केला जाणार आहे. त्याचप्रमाणे विविध वाङ्मयीन कोश, विशेषांक, नियतकालिके, संग्रहीत मुलाखती इत्यादींचाही आवश्यकतेनुसार वापर केला जाईल.

संशोधन पद्धती

मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाचा अभ्यास करताना साहित्यकृतीचा लेखक आणि त्याचे साहित्य याचा अनुबंध लावताना तत्कालीन समाजजीवन जाणून घेण्यासाठी समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती उपयुक्त ठरेल. त्याचप्रमाणे वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, मानसशास्त्रीय, चरित्रात्मक, ऐतिहासिक अशा प्रसंगानुरूप विविध संशोधन पद्धतीच्या संशोधनासाठी उपयोग करण्यात येईल.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले - प्रवासवर्णन संकल्पना आणि स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात प्रवासवर्णन अर्थ व संकल्पना, प्रवासवर्णनाचे स्वरूप, प्रवासवर्णनाची पूर्वपिठिका, प्रवासवर्णन संकल्पनेचा कोषागत अर्थ यांचा आढावा घेण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रवासवर्णनाचे मूलभूत घटक, प्रवासवर्णन आणि प्रवासी, लेखक आणि प्रदेश, प्रवास वर्णनाची वैशिष्ट्ये अशा विविध अंगांनी प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे - मीना प्रभु : व्यक्तित्व आणि वाङ्मयीन कर्तृत्व

लेखिकाच्या एखाद्या साहित्यप्रकारावर संशोधन करत असताना ते निर्माण करणाऱ्या लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू जाणून घेणे संशोधन कार्याच्या यशस्वीतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. म्हणून या प्रकरणात मीना प्रभु यांचा जन्म, बालपण, परिस्थिती, शिक्षण इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात येईल. तसेच लेखिकेवर झालेले संस्कार, त्यांच्या लेखनामागील प्रेरणा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर व लेखनावर इतरांचा पडलेला प्रभाव, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची झालेली जडणघडण यांचा परामर्श घेतला जाईल. तसेच त्यांना मिळालेले पदे, सन्मान, पुरस्कार यांचाही आढावा घेऊन मीना प्रभु यांच्या शैक्षणिक, सामाजिक, वाङ्मयीन कार्याचा प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे - मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाचे स्वरूप

या प्रकरणात मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनातील सामाजिक चित्रण, त्या-त्या प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये, स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व, सांस्कृतिक पार्श्वभूमी तसेच आर्थिक,

राजकीय, शैक्षणिक, धार्मिक परिस्थिती व स्वरूप इ. सर्व घटकांचा विवेचनात्मक पद्धतीने शोध घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनातील व्यक्तीदर्शन

या प्रकरणात मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनात प्रतिबिंबित झालेल्या विविध प्रदेशातील व्यक्तीचे चित्रण, माणसांचे स्वभाववैशिष्ट्ये, त्यांची जीवनशैली, आचार-विचार इत्यादी घटकांच्या अनुषंगाने विविध व्यक्तीदर्शनाचा शोध घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनातील वाङ्मयीन विशेष

या प्रकरणात मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनाची लेखनशैली, निवेदनशैली, स्थळाचे-व्यक्तीचे-प्रसंगाचे वर्णनकौशल्य, वाङ्मयीन मूल्य इत्यादी घटकांच्या अनुषंगाने वाङ्मयीन विशेषांचा शोध घेण्यात येईल. त्याचप्रमाणे मीना प्रभु यांच्या प्रवासवर्णनातील वाङ्मयीन विशेषांचा शोध घेताना त्यातील रसपरिपोष, अलंकार, कल्पनाविलास, प्रतिक-प्रतिमांचा वापर कसा केला गेला आहे याचा शोधही या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - निष्कर्षात्मक विवेचन

या प्रकरणात शोधप्रबंधाच्या वरील पाच प्रकरणांतून करण्यात आलेल्या संशोधनपर अभ्यासाचा संक्षिप्त आढावा घेण्यात येईल. तसेच वरील प्रकरणात जी सविस्तर विवेचनात्मक मांडणी करण्यात आलेली आहे त्याअनुषंगाने हाती आलेल्या निष्कर्षाची नोंद या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

टीप : प्रत्यक्ष शोधकार्य करताना या विषयावरील मांडणी दरम्यान काही बदल संभवू शकतात. आवश्यक तेथे बदल करण्याची गरज भासल्यास संशोधक मार्गदर्शकाच्या सल्ल्याने व निर्देशानुसार तसा बदल करण्यात येईल.

परिशिष्ट्ये

१) आधारभूत ग्रंथ

१.१ मीना प्रभु यांची प्रवासवर्णने

१) माझं लंडन

२) दक्षिणरंग

३) मेक्सिकोपर्व

४) चिनी माती

५) इजिप्तायन

६) ग्रीकांजली

७) तुर्कनामा

८) गाथा इराणी

९) रोमराज्य खंड १

१०) रोमराज्य खंड २

११) वाट तिबेटची

१२) न्यूयार्क न्यूयार्क (एक नगरात जग)

२) संदर्भ ग्रंथ सूची (सहाय्यभूत ग्रंथाची यादी)

१) सुखनिधी तुझा माझा (कवितासंग्रह)

२) डायाना चार्ल्स-मुखवट्याचे चेहरे (कादंबरी)

३) छायाचित्रे

४) संग्रहीत मुलाखती

५) नियतकालिकातील लेखन

लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, तरुण भारत, लोकमत इत्यादी वृत्तपत्रातून तसेच ललित, मौज, सत्याग्रही, कालनिर्णय, शतायुषी, ज्ञानप्रबोधन अशा प्रमुख मासिकांतून विविध विषयावर मीना प्रभु यांनी केलेले लेखन.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे
मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर

संशोधक
बिरादार अरविंद व्यंकटराव